महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९४ वे | दिनांक : २०/१०/२०२६ | वार : मंगळवार

## सातारा जिल्हा बँक निवडणुकीत मोठी घडामोड



**सातारा** : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत महत्त्वाच्या घडामोडींना वेग आला आहे. विधान परिषदेचे माजी सभापती आणि बँकेचे विद्यमान संचालक रामराजे नाईक-निंबाळकर यांनी फलटण तालुका सोसायटी आणि कृषी प्रक्रिया या दोन्ही मतदारसंघांतील आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) निकषांनुसार सलग दहा वर्षांहून अधिक काळ संचालकपदावर राहिलेल्या नेत्यांच्या पात्रतेबाबत प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने, भविष्यात अपात्रतेची नामुष्की टाळण्यासाठी रामराजेंनी निवडणुकीतून माघार घेतल्याची चर्चा आहे. त्यांच्या या निर्णयामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी सध्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर रामराजे नाईक-निंबाळकर यांनी फलटण तालुका सोसायटी आणि कृषी प्रक्रिया या दोन्ही मतदारसंघांतील उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. रामराजे हे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते असून, जिल्हा बँकेच्या राजकारणात त्यांचे महत्त्वाचे स्थान राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या माघारीचा परिणाम संबंधित मतदारसंघांतील निवडणुकीवर कसा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, रामराजेंनी माघार घेतली असली तरी फलटण तालुका सोसायटी आणि कृषी प्रक्रिया मतदारसंघांतील निवडणुकीचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. या मतदारसंघांत अन्य उमेदवार रिंगणात असल्याने निवडणुकीतील चुरस कायम राहण्याची शक्यता आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतरच कोणत्या मतदारसंघांत थेट लढती होणार आणि कुठे निवडणुकीचे वेगळे चित्र दिसणार, हे स्पष्ट होईल. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सर्वाधिक लक्षवेधी ठरलेल्या कराड तालुका सोसायटी मतदारसंघातही राजकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हा बँकेच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव राहिलेल्या लोकनेते दिवंगत विलासकाका उंडाळकर यांचे सुपुत्र अॅड. उदयसिंह पाटील-उंडाळकर या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. मागील पराभवाचा वचपा काढण्याच्या तयारीने त्यांनी यंदा निवडणुकीच्या मैदानात उतरल्याचे चित्र आहे. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्यासमोर माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांचे आव्हान आहे. त्यामुळे कराड तालुका सोसायटी मतदारसंघातील लढत प्रतिष्ठेची ठरण्याची शक्यता आहे. बाळासाहेब पाटील आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवणार की माघार घेऊन त्यांच्या जागी अन्य उमेदवाराला संधी दिली जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. या निर्णयावर कराडमधील निवडणुकीचे अंतिम स्वरूप अवलंबून राहणार आहे.

## शेतकऱ्यांना 5 हजार रुपये देऊन काय होणार?:सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली; सुप्रिया सुळेंचा आरोप



**छत्रपती संभाजीनगर** : राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची कर्जमाफी, बँकांकडून कर्जाची रक्कम रोखून ठेवण्याचे प्रकार आणि वाढती गुन्हेगारी या मुद्द्यांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. "5 हजार रुपयांत काय होणार? शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपयांची मदत मिळाली पाहिजे. काळ्या मातीशी इमान राखणाऱ्या शेतकऱ्यांची या सरकारने फसवणूक केली आहे," असा आरोप त्यांनी केला. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या मदतीवर बोलताना सुळे म्हणाल्या की, सरकारकडून शेतकऱ्यांना 5 हजार रुपयांची मदत दिली जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, शेतकऱ्यांचे नुकसान पाहता ही रक्कम पुरेशी नाही. शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपयांची मदत मिळाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचेही पैसे शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत, असा दावा त्यांनी केला. योजनेचे 2 हप्ते म्हणजेच 4 हजार रुपये अद्याप मिळाले नसल्याचे सांगत, दुष्काळी मदतीचे 5 हजार आणि योजनेचे 4 हजार रुपये मिळून शेतकऱ्यांना 9 हजार रुपये मिळायला हवेत. त्याशिवाय हेक्टरी 1 लाख रुपयांच्या मदतीची मागणी कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ढोरेगव्हाण गावात कर्जमाफी झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यावर नवीन कर्जाची रक्कम जमा झाली; मात्र बँक अधिकारी ती रक्कम रोखून ठेवत असल्याची तक्रार पत्रकारांनी केली. यावर प्रतिक्रिया देताना सुळे म्हणाल्या, "सरकारने खरंच निधी दिला असेल, तर बँकेला तो अडवण्याचा अधिकार नाही. हा प्रकार असेल, तर तो चिंताजनक आहे." या प्रकरणाची माहिती आपण स्वतः मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे केली होती, असे सुळे म्हणाल्या. "हा निवडणुकांचा काळ नाही, तर शेतकऱ्यांना न्याय देण्याचा काळ आहे. शेतकरी आपल्यासाठी प्रचंड मेहनत करतो. आज आपण त्याला साथ देणार नाही, तर कधी देणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## टायगरच्या हत्येचा कट उधळला; कोटा येथे ३ शूटर अटकेत

**मुंबई** : अभिनेता टायगर श्रॉफवरील हल्ल्यासंदर्भात मुंबई पोलिसांनी सोमवारी पत्रकार परिषद घेतली. मुंबई पोलिसांच्या डीसीपींनी सांगितले की, ज्या पद्धतीने गोळीबार करण्यात आला, त्यावरून आरोपी हत्येचा कट रचून आले होते हे स्पष्ट होते. दरम्यान, टायगरच्या गाडीवर गोळीबार करणाऱ्या हल्लेखोरांना राजस्थानमधील कोटा रेल्वे स्टेशनवर १५ तासांच्या आत पकडण्यात आले. रविवारी रात्री ७ वाजता टायगरवर हल्ला झाला होता. आरोपी जयपूर आणि दिल्लीमार्गे नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत होते. मुंबई पोलिसांकडून माहिती मिळाल्यानंतर कोटा पोलिसांनी त्यांना सकाळी १०:३० वाजता रेल्वे स्टेशनवर अटक केली. कोटाच्या एसपी तेजस्विनी गौतम यांच्या म्हणण्यानुसार, ते तिघे पुणे-जयपूर एक्स्प्रेसने जयपूरला जात होते. त्यांना जनरल कोचमध्ये ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून कोणतीही शस्त्रे जप्त करण्यात आली नाहीत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, लॉरेन्स गँगच्या अनिल पंडितने हा हल्ला घडवून आणला होता. अनिलने एक व्हिडिओ प्रसिद्ध करून या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. टायगरला गोळी लागली नाही, पण बंदुकीच्या दारूगोळ्यामुळे आणि काचेच्या तुकड्यांमुळे त्याचा डावा हात जखमी झाला. या गोळीबारात त्याचा ड्रायव्हरही जखमी झाला.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


## विजयादशमी तथा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त धम्मभूमी, बुद्धलेणी परिसरात विविध उपक्रमांचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर** : विजयादशमी तथा 70 व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त आज, मंगळवार, दि. 20 ऑक्टोबर 2026 रोजी शहरात विविध सामाजिक व धम्मविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील धम्मभूमी, बुद्धलेणी परिसरात या दिनानिमित्त धम्म अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर व्हेन. विशुद्धानंद बोधी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्राच्या वतीने आयोजित या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवा आणि मानवतावादी विचारांचा प्रसार केला जाणार आहे. या उपक्रमांना भदंत नागसेनबोधी थेरो (औरंगाबाद), भदंत संघप्रिय थेरो (औरंगाबाद), भदंत आर. आनंद थेरो (कोल्हापूर), भदंत शिलबोधी थेरो (मुंबई), भदंत धम्मबोधी आणि भदंत निर्वाण यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विविध शहरांतील बौद्ध भिक्खूंच्या मार्गदर्शनामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, त्यांच्या मार्गदर्शनातून भगवान गौतम बुद्धांच्या प्रज्ञा, करुणा, शांती आणि समतेच्या विचारांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. विजयादशमी तथा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाला ऐतिहासिक महत्त्व आहे. बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेमुळे हा दिवस समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना उजाळा देणारा ठरला आहे. तथागत भगवान गौतम बुद्धांचा शांती, करुणा आणि समतेचा संदेश समाजात रुजविणे, तसेच गरजू नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित होणार असून, मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळणार आहे. विजयादशमी तथा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त आयोजित सामाजिक व धम्मविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि भगवान गौतम बुद्ध व बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समताधिष्ठित विचारांचा अंगीकार करावा, असे आवाहन राजकुमार कांबळे, अमरदिप हिवराळे, प्रा. गुणरत्न सोनवणे आणि अक्रम खान यांनी महामाया आधार सेवाभावी संस्था, विनर्स एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर मल्टिपर्पज सोसायटी, औरंगाबाद तसेच रिधीमाँ फाउंडेशन, औरंगाबाद यांच्या वतीने केले आहे.

## पंढरपूरच्या विठ्ठलचरणी प्रा. शंकर विधाते यांची स्वरसेवा




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात कार्यरत असलेले आणि ग्रामीण भागातून आपल्या गायनकलेच्या बळावर संगीत क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे प्रा. पंडित शंकर विधाते यांनी पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित नवरात्र संगीत महोत्सवात शास्त्रीय गायन आणि भजनांच्या माध्यमातून श्री विठ्ठलचरणी स्वरसेवा अर्पण केली. संत तुकाराम महाराज भवन येथे झालेल्या या संगीतसेवेने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. संगीतप्रेमी आणि भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही भजनसंध्या विशेष रंगली.शास्त्रीय संगीताची अभिजातता आणि भक्तिसंगीतातील भावपूर्णता यांचा सुरेख संगम विधाते यांच्या गायनातून अनुभवायला मिळाला. त्यांच्या सादरीकरणात रसिक तल्लीन झाले होते. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद देत प्रा. शंकर विधाते आणि त्यांच्या साथीदार कलाकारांवर पुष्पवृष्टी केली. संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली, तर भाविक आणि संगीतप्रेमींनीही गायनाचा मनमुराद आनंद घेतला.या स्वरसेवेत प्रा. विधाते यांना प्रा. गणेश कोटीये यांनी गायनसाथ केली. संदीप गुंजकर यांनी तबला, शिवराज चव्हाण यांनी पखवाज, प्रतीक साळुंके यांनी संवादिनी आणि बाळासाहेब यांनी टाळसाथ केली. दिलीप शिरसाठ यांनी निवेदनाची जबाबदारी सांभाळली. सर्व साथीदारांच्या सुरेल साथसंगतीमुळे गायन सादरीकरण अधिक प्रभावी ठरले.श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने पंढरपूरच्या पवित्र भूमीत गायनसेवेची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रा. विधाते यांनी समितीचे मनःपूर्वक आभार मानले. विठ्ठलचरणी संगीतसेवा अर्पण करण्याची संधी ही आपल्या संगीतसाधनेतील आनंददायी आणि अविस्मरणीय अनुभूती असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.ग्रामीण भागातून पुढे येत आपल्या सांगीतिक साधनेच्या जोरावर संगीत क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या प्रा. शंकर विधाते यांच्यासाठी पंढरपूरच्या पावन भूमीत विठ्ठलचरणी स्वरसेवा अर्पण करण्याचा हा सोहळा त्यांच्या सांगीतिक प्रवासातील अविस्मरणीय पर्व ठरला.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


## नवदुर्गा : लेखमाला -२ : शांताबाई श्रीपती यादव

बीडजुलै 1984 मध्ये, भारताच्या महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील हासूरससगिरी गावातील न्हावी श्रीपती यादव यांचा अचानक हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. त्यांची पत्नी शांताबाई, ज्यांचा बालविवाह झाला होता, त्या चार लहान मुलींसह आणि उत्पन्नाचे कोणतेही साधन नसताना एकट्या पडल्या. लवकरच कुटुंबासमोर उपासमारीची वेळ आली. मग तिने एक धाडसी निर्णय घेतला. तिने आपल्या पतीच्या मागे राहिलेली अवजारे हातात घेतली: वस्तरा, कात्री, कंगवा आणि ब्लेड शार्पनर. त्या काळी केस कापण्याचे काम फक्त पुरुषच करत असत आणि एका महिलेने ते करणे लोकांना थक्क करणारे होते. अगदी तिच्या मृत पतीच्या स्वतःच्या भावांनीही ते कधीच स्वीकारले नाही. पण हरिभाऊ कडूकर नावाच्या गावातील एका ज्येष्ठाने तिचे पहिले ग्राहक बनण्याची तयारी दाखवली, आणि त्या एका हेअरकटने तिला पुढे चालू ठेवण्याचे धाडस दिले. त्या केस कापत, दाढी करत आणि जनावरांचीही निगा राखत. 2016 मध्ये, वयाच्या 70 व्या वर्षी, त्या अजूनही काम करत होत्या, हेअरकट आणि दाढीसाठी 50 रुपये आकारत होत्या. हळूहळू त्यांच्याभोवतीचा विरोध कमी झाला. त्यांच्या या कामामुळे त्यांच्या चार मुलींचे पोट भरले आणि संगोपन झाले. आज त्यांना भारताची पहिली महिला न्हावी म्हणून मोठ्या प्रमाणावर ओळखले जाते.



**लेखक : भगवंत पाळवदे, अंबाजोगाई**

## कौठळी येथे महावितरणच्या मुख्य विद्युत तारांमुळे ५ ते ६ एकरांतील ऊस जळून खाक; तब्बल २० लाख रुपयांचे नुकसान!



**कौठळी, ता. परळी - वै. जि. बीड :** कौठळी येथील मधुकर शंकरराव झिंजुर्डे, तुकाराम हानवते, शुद्धोधन हनवते आणि धोंडिराम झिंजुर्डे यांच्या शेतातील उभ्या ऊस पिकावर महावितरणची मुख्य विद्युत तार तुटून पडल्याने,आग लागून ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली.या दुर्घटनेत अंदाजे ५ ते ६ एकरांतील ऊस पिकाचे सुमारे २० ते ३० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.आधीच दुष्काळाची भयानक परिस्थिती, पाऊस येण्याचे चिन्ह नाहीत, पाण्याची टंचाई आणि वाढता शेतीखर्च यामुळे शेतकरी अडचणीत असतांना, मोठ्या कष्टाने जगवलेले उभे पीक डोळ्यांसमोर जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे.दुष्काळात तेरावा महिना! आधी निसर्गाची अवकृपा आणि आता महावितरणच्या विद्युत तारांमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. म्हणून शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंब अहवालदिल आणि चिंताग्रस्त झाले आहे.ऊस जळालेल्या शेतकऱ्यावरती मोठे संकट आले आहे.अशा संकटाच्या वेळी शासनाने शेतकऱ्यांचा झालेले नुकसान याची ताबडतोब पाहणी करून नुकसान भरपाई जाहिर करावी.आणि अशा आपत्कालीन आलेल्या संकटातून शेतकऱ्यांना सरकारने वाचवावे;असा सूर सर्व शेतकरी बांधव आणि समाज माध्यमातून निघत आहे.

## कर संहार दुर्जनांचा

कलियुगातली ललना,
तूच दुर्गा, तूच काली,
तूच आहे गोरगरिबांची,
संकट काळात वाली. 1

कर्तव्याच्या शक्तीने तू,
संकटकाळात साथ द्यावे.
अन्याय अत्याचार होता,
दुष्ट शक्तीचे समाचार घ्यावे. 2

तूच दुर्गा, तूच काली,
अन्यायावर तुटून पडावे.
रौद्र रूप तुझे पाहताच,
शत्रूलाही अद्दल घडावे. 3

तूच दुर्गा, तूच काली,
कर संहार दुर्जनांचा.
भ्रष्टाचारी लोकांपासून,
रक्षा करावे सज्जनांचा. 4

तूच दुर्गा, तूच काली,
तूच आहे शक्तिशाली.
सज्जनांच्या रक्षणाला,
तूच दुर्गा सामर्थ्यशाली. 5



**नागेश बोंतेवाड, छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे सॉफ्ट स्किल्सवर अतिथी व्याख्यानाचे आयोजन




**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर येथे इंग्रजी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी "सॉफ्ट स्किल्स " या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुदेश भोवते होते. या सत्रासाठी डॉ. राजश्री गजघाटे, प्राध्यापक, इंग्रजी विभाग, श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.या प्रसंगी इंग्रजी विभागातील इतर वरिष्ठ प्राध्यापक डॉ. अमोल डी. मेंढे आणि NAAC समन्वयक डॉ. मेघा रामटेके विचार पिठावर यांची देखील विशेष उपस्थिती होती .प्रमुख अतिथी वक्ता डॉ. गजघाटे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत यशाचा किल्ला काबीज करण्यासाठी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व विषद केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी संघ भावना , नेतृत्वगुण , वेळेचे व्यवस्थापन, वक्तशीरपणा, भावनिक बुद्धिमत्ता, सकारात्मक दृष्टिकोन, कार्यनिष्ठा, निर्णय क्षमता आणि व्यक्तिमत्व विकासाच्या इतर अनेक महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला. डॉ. सुदेश भोवते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्याचे आणि शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाचे कौतुक केले.डॉ. अमोल मेंढे यांनी अतिथी व्याख्याना मागील प्रास्ताविक भूमिका विषद केली . बी.ए.भाग. तीन ची विद्यार्थिनी कु.रिमा सोनटक्के यांनी अतिथींचा परिचय करून दिला. कु. स्मिता गौरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर कु. जावेरिया फातिमा यांनी आभार प्रदर्शनाची धुरा सांभाळली. विभागातील इंग्रजी लिटररी सोसायटीच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या सर्व टप्प्यांमध्ये महत्व पूर्ण सहकार्य केले. प्रा. महेश दुधे, डॉ. सना कौसर, डॉ. आसिया सय्यद आणि विभागातील सर्व प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.या सत्राला 70 पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षकवृंद या प्रसंगी उपस्थित होते. महाविद्यालय परंपरेनुसार राष्ट्रगीताने सत्राचा समारोप झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


# यशवंत नवरात्र महोत्सव विविध सांस्कृतीक कार्यक्रमाने साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले)** : संपूर्ण भारत भर नवरात्र उत्सव हर्ष उल्हासात साजरा होत असताना अनेक ठिकाणी कोरडा दुष्काळ अशी स्थिती निर्माण झालेली आहे . शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत . अनेक ठिकाणी शेती याचे नुकसान झालेले आहे . या सर्व दुष्काळग्रस्तासाठी यशवंत नवरात्र महिला मंडळां नेकुंकुमार्चन हा हिंदू धर्मातील देवीच्या उपासनेतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावी पूजापाठ केला 'कुंकुमार्चन' म्हणजे 'कुंकुम' (लाल कुंकू) आणि 'अर्चन' म्हणजे पवित्र नामांचा जप करत केलेले पूजन होय.यामध्ये इच्छित देवीच्या मूर्तीवर 1000 नामांचा-सहस्रनामावली, श्रीसूक्त मंत्राचा जप करत एक-एक चिमूटभर कुंकू अर्पण केले जाते. काही परंपरांमध्ये देवीच्या चरणांपासून मस्तकापर्यंत किंवा श्रीयंत्रावर प्रेमाने कुंकू वाहतात. कुंकू हे सौभाग्य व मांगल्य आणि शक्तीचे प्रतीक मानले जाते. यामुळे देवीची कृपा लवकर लाभते, कुटुंबात सुख-शांती आणि सकारात्मक ऊर्जा नांदते. कुंकुमार्चनामध्ये अर्पण केलेले कुंकू नंतर प्रसाद म्हणून कुटुंबातील सदस्यांना वाटले जाते आणि ते स्वतःच्या कपाळावर किंवा सिंदूर म्हणून लावले जाते.नवरात्रौत्सव, पौर्णिमा, अष्टमी, चतुर्दशी, मंगळवार, शुक्रवार किंवा गुरुपुष्यामित्र योगावर हा विधी विशेष फळदायी मानला जातो. या कुंकुमार्चनातून देवीला प्रार्थना करण्यात आली . हे जे मराठवाड्यावर संकट आलेलं आहे ते लवकर दूर व्हावे आणि शेतकरी बांधवाना या सर्व संकटाच्या परिस्थितीत त्यांचे मनोबल कायम ठेवून या संकटातून लवकरात लवकर सोडवावे . यासाठी कुंकूमार्चनातून देवीची विनवणी करण्यात आली .या कार्यक्रमासाठी प्रा. विजया बेलकेरी, सौ.सुरेखा घोडके, सौ.संगीता देशमाने मॅडम, सौ.सविता गाडेकर,सौ. सौ.कविता जाधव,सौ.विजया पाटील,सौ.मिना टाचले ,सौ.कौशल्या चव्हाण,सौ.अंबिका सुरवसे,सौ.पद्मा टाचले, सौ.शितल राजपुत,श्रीमती निर्मला बोगरगे,श्रीमती कविता निलवाडे,सौ,सविता धर्माधिकारी, या मंडळीनी सहभाग घेतला .या नवरात्र मोहत्सवातदररोज आराधी मंडळाकडुन देवीची प्रार्थना,सकाळ संध्याकाळ देवी भक्ताकडुन महाआरती सोबतच महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत आहे.तसेच महिलांसाठी गरबा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.या प्रसंगी अजिंक्य राठोड यांनी तुळजापुरच्या भवानीमातेची भव्य अशी रांगोळीचे आकर्षण ठरले.तसेच दररोज भाविकासाठी देवीची साडी चोळीने ओटी भरुन मोठ्या भक्ती भावाने पुजा करुन नंतर प्रसादाचे वाटप केले जाते.या नवरात्र मोहत्सव यशस्वी पणे पार पाडण्यासाठी नवरात्र महोत्सव मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह चव्हाण,उपाध्यक्ष दिनेश कोरे, तेजस निलवाडे, श्रीधर निलवाडे, संजय सुरवसे,गौरीशंकर बोंगरगे,चेतन कंटे, धनपाल चौव्हाण, शुभम चौव्हाण, अनिकेत पाटील, निरज पडलवार, निशांत पडलवार, मानव चव्हाण, सोमनाथ जाधव, ओंकार सुरवसे, प्रितेश राठोड, श्रेयश चव्हाण उदय घैसास, सतीश कुंभार,विशाल कुंभार या नवरात्र मोहोत्सव पदाधिका-यांचा व यशवंत नगर मधील महिला भाविकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.

# तांडा

तांडा निघाला घेऊन आपले फाटके बिऱ्हाड,<br>
सण दिवाळीचा साजरा करून मांडतील हो ऊसाचे गुऱ्हाड.<br>
टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी वण-वण ते भटकतील,<br>
हाती घेऊन कोयता सप-सप ऊस ते तोड़तील.

तांडा निघाला हो वस्ती सोडून आपले म्हातारे माय-बाप,<br>
बैल-गाडी घेऊन निघाले, सोबतीला जन्मोजन्मी ऊस तोडीचा हो शाप.<br>
घरदार, गावाचा निरोप घेऊनी संगे आपुला प्रेमाचा गोतावळा,<br>
काट्या-कुपाटीतून चिखल तुडवीत शोधितो हो ऊसाचा मळा.

तांडा निघाला उघड्यावर आपले नशीब हो आजमावयाला,<br>
त्यांच्या लेकरांना कधी मिळत नाही हो शाळेचे तोंड बघायाला.<br>
त्यांच्या पाचवीला पुजली हो तीन दगडांच्या चुलीवरची चटनी-भाकर,<br>
बैल-गाडीच्या चाकावरती फिरतो हो त्यांचा हा मोकळा संसार.

तांडा निघाला हो ऊन, वारा, पावसाशी दोन हात करायाला,<br>
कारभारणी उभी राही पाठीशी, बळ मिळे हो गडीला लढायाला.<br>
त्यांच्या लेकरांना कधी मिळेल हो चांगले शिक्षण,<br>
त्यांचा उद्धार होऊन कधी होईल, त्यांचा ही समाजात मानाचे औक्षण.

तांडा निघाला हो वर्षानुवर्ष उराशी घेऊन स्वप्न आपले कोयता मुक्ती,<br>
राजकारण्याच्या खोट्या आश्वासनांची पहाट घेऊन येती पुन्हा हो तीच कोयता सक्ती.

तांडा पुन्हा निघाला हो जीवनाची आपली उसवलेली गोधडी शिवायाला,<br>
मर-मर राबुन हो एक-एक पैसा जोडायाला.<br>
कधी संपेल हो ऊसतोड कामगार बांधवांचा वनवास,<br>
कधी येईल त्यांच्या ही वाटेला सुखाचे हो चार घास.

**प्रा. डॉ. जे. एस. पाटील.**<br>
**पिशोर**

# कन्नड येथे पथनाट्याद्वारे शालेय विद्यार्थ्यांनी केली जनजागृती




**कन्नड (अरुण थोरात)** : रस्ते सुरक्षा व अंमली पदार्थ विरोधी अभियान अंतर्गत परि. पोलीस उपअधीक्षक आरती पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे, सागर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली काशिनाथ पाटील विद्यालय कन्नड व जिल्हा परिषद अंधानेर येथील विद्यार्थ्यांनी कन्नड बस स्थानक येथे जनजागृती पथनाट्य सादर केले. काशिनाथ पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत जबाबदार नागरीक म्हणून कोणते कोणते नियम पाळले पाहिजे याविषयी पथनाट्य सादर केले तसेच जिल्हा परिषद अंधानेर येथील विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांना ठाम नकार भविष्याचा स्वीकार या विषयावर पथनाट्य सादर केले. या पथनाट्यांसाठी प्रवीण दाभाडे, मिनाक्षी बडग यांनी मार्गदर्शन केले, यात वेदांत धनई, शौर्य गिरी, अरहान शेख, श्रेयस भालेराव, श्लोक मोहिते, आयुष चव्हाण, प्राची देवरे, आरोही वाघ, स्वराली मगर, रिया खरे, प्रेक्षा गायकवाड, उपासना वाघ, मयुरी गवळी, सृष्टी वाघ, मनस्वी आहेर, सारिका वाघ, नाजीया शेख, मानवी निकम, शिवतेज पैठणकर, यश सातदिवे, अमृत बाविस्कर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी पोलीस अंमलदार संजय आटोळे, प्रदीप चव्हाण नागरिकांची नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


## पर्यावरणप्रेमी बहुली गावात आपट्याचे रोपण करून दसरा करतात साजरा



**कन्नड (अरुण थोरात) :** दसरा सणाला आपटा, कांचन व शमी पूजन करण्याची परंपरा आहे. मात्र लोक आपट्याची पाने ओरबाडून ती एकमेकांना सोने म्हणून भेट दिली जातात. आपट्याची लागवड मात्र कोणीही करत नाही. यामुळे या झाडांची संख्या धोक्यात आली आहे. सध्या राज्यभर झाडे वाचवण्यासाठी विविध चळवळी यात अग्रेसर आहेत. सिल्लोड तालुक्यातील बहुली हे गाव पर्यावरण व संस्कृती संवर्धन व्हावे यासाठी सिल्लोड येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह व अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांच्या आवाहनास राज्यभर उत्तम प्रतिसाद मिळत असून बहुली येथील तरुण, वृद्ध , महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी गेल्या आठ वर्षांपासून आपट्याचे पाने न तोडता दसरा सण साजरा करण्यास प्राधान्य देत आहेत. याच आपट्याचे आज दसऱ्याच्या पूर्व संध्येला गावकऱ्यांनी दरवर्षी प्रमाणे बहुली येथे जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात रोपण करण्यात आले. आपट्याच्या पानांवर खालच्या बाजूने विविध प्रजातीची फुलपाखरे अंडी घालतात. जी पाने तोडनाऱ्यास दिसत नाही. शिवाय या झाडाची पाने हरीण,भेकर, ससे, खार, माकड इ. वन्यजीव आवडीने खातात. गेल्या दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सिल्लोड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक अनेक ठिकाणी तीन क्विंटल हून अधिक आपट्याचे पाने विक्री न झाल्याने रस्त्याच्या बाजूला फेकलेली होती. काही विक्रेत्यांनी शेकडो झाडे ओरबाळून पोतेचे पोते भरून ही पाने विक्रीसाठी आणली होती.फुलपाखरांसाठी सोन्याचे पान- आपट्याच्या पानांवर लेमन ईमिग्रांट, ब्लॅक राजह, ट्राय कलर पिड फ्लॅट , प्लेन टाऊनी राजाह , टेलड जॉय या फुलपाखरांचा हा "होस्ट प्लांट "असून यावर सदर प्रजातींची फुलपाखरे अंडी घालून कोष विकसित करतात. पान तोडतांना पांनाच्या खालील बाजूस चिपकलेली ही सूक्ष्म अंडी नष्ट होतात व भिरभीरणारे जीवन संपून जैवविविधतेची हानी होते. यासाठी जागरुक राहणे गरजेचे आहे.

## जिंतूर येथील शेताच्या वादातून शेतकऱ्यांची नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शेतातील धुर्यावरील कोपंन तोडून शेताचे नुकसान केल्याप्रकरणी जिंतूर पोलीस स्टेशन येथे सुरेंद्र गेंदमल भाटिया रा. परभणी यांच्यासह दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहे याबाबत असे की जिंतूर शिवारातील गट क्र. ११९/अ /२ मधील शेतात गाईला वैरण करीत असताना फिर्यादी किंवा फिर्यादीचे शेतमालक यांना कोणतेही कल्पना न देता किंवा विचारणा न करता माघारी सर्व आरोपींनी संगणमत करून शेतीचे ताराचे दुर्यावरील कुपन तोडून शेतातील अंदाजे ७०००० रु. चे नुकसान केले म्हणून गट क्र. ११९/अ/२ चे मालक सचिन भुजंगराव गोरे यांचे मुनीम कैलास वसंतराव सडाळ रा. अकोली यांच्या फिर्यादीवरून १) सुरेंद्र गेंदमल भाटिया रा.परभणी २) जुनेद जमील अहमद रा.जिंतूर ३)नाव माहित नाही यांच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर क्र. ५९८/२६ चे कलम ३२४(४) ३(५) बी एन एस प्रमाणे जिंतूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार असून आरोपीचा पोलीस शोध घेत आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हेमराज नेताम करीत आहे

## प्रामाणिकपणाचा आदर्श! माजी सैनिकाची बॅग सुरक्षितपणे परत; मेस्को सुरक्षा रक्षक शेख समी यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रत्यय जिंतूर येथे आला आहे. प्रवासादरम्यान बसमध्ये राहून गेलेली माजी सैनिकाची ड्युटीची बॅग जिंतूर आगारातील मेस्को सुरक्षा रक्षक शेख समी यांनी प्रामाणिकपणे जिंतूर पोलीस ठाण्यात जमा केली. विशेष म्हणजे, या बॅगेमध्ये सुरक्षा रक्षकाच्या गणवेशासह कमरपट्टा, मोबाईल चार्जर आणि पाच काडतुसे आढळून आली होती. संबंधित वस्तू सुरक्षित राहाव्यात आणि त्या मूळ मालकाला परत मिळाव्यात, या उद्देशाने शेख समी यांनी दाखविलेली तत्परता कौतुकास्पद ठरली आहे. रविवार, दि. 18 ऑक्टोबर रोजी पोलिसांच्या उपस्थितीत ही बॅग संबंधित माजी सैनिकाला परत करण्यात आली.मिळालेल्या माहितीनुसार, केशव जगन्नाथ मुंढे (वय 51 वर्षे) हे माजी सैनिक असून, सध्या बँक ऑफ इंडिया, आंबेजोगाई शाखेत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते परळी, जिल्हा बीड येथील रहिवासी आहेत. शुक्रवार, दि. 16 ऑक्टोबर 2026 रोजी लातूर-जिंतूर मार्गावरील एमएच 14 बीटी 3034 क्रमांकाच्या वाहनातून प्रवास करताना त्यांची ड्युटीची बॅग जिंतूर आगारातील बसमध्ये राहून गेली होती.दरम्यान, जिंतूर आगारातील मेस्को सुरक्षा रक्षक शेख समी यांच्या निदर्शनास ही बॅग आल्यानंतर त्यांनी जबाबदारीने पुढाकार घेतला. बॅग स्वतःकडे न ठेवता तिच्यातील साहित्य सुरक्षित राहावे आणि योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचावे, या हेतूने त्यांनी आगार प्रमुख चव्हाण साहेब यांच्या उपस्थितीत ती जिंतूर पोलिसांकडे सुपूर्द केले.संबंधित बॅगेमध्ये एक युनिफॉर्म शर्ट, कमरपट्टा, कमरपट्ट्याच्या पाकिटात पाच काडतुसे आणि मोबाईल चार्जर असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे ही बॅग सुरक्षितपणे पोलिसांकडे जमा करणे महत्त्वाचे होते. शेख समी यांनी कोणतीही बेपर्वाई न करता बॅग पोलीस ठाण्यात जमा केली. त्यांच्या या कृतीमुळे बॅगेतील साहित्याची सुरक्षितता राखण्यास आणि ते संबंधित व्यक्तीपर्यंत परत पोहोचविण्यास मदत झाली.विशेषतः काडतुसांसारख्या संवेदनशील वस्तू आढळल्यास त्या स्वतःकडे न ठेवता संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणे आवश्यक असते. या घटनेत शेख समी यांनी दाखविलेली जबाबदारी ही सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी आदर्श ठरणारी आहे.पोलिसांच्या उपस्थितीत बॅग मूळ मालकाच्या स्वाधीनरविवार, दि. 18 ऑक्टोबर 2026 रोजी माजी सैनिक केशव जगन्नाथ मुंढे हे बॅग घेण्यासाठी जिंतूर पोलीस ठाण्यात उपस्थित झाले. यावेळी बिट जमादार लांडगे आणि मेस्को सुरक्षा रक्षक शेख समी यांच्या उपस्थितीत त्यांना बॅग परत करण्यात आली. या घटनेची जिंतूर पोलीस ठाण्याच्या जनरल डायरीमध्ये अधिकृत नोंद करण्यात आली आहे.पोलीस ठाण्याच्या उपलब्ध नोंदीनुसार, जनरल डायरी क्रमांक 017 अन्वये दि. 18 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 12 वाजून 31 मिनिटांनी या घटनेची नोंद झाली. पोलीस निरीक्षक नामदेव शिवाजीराव मद्दे यांच्या नोंदीखाली हा तपशील नोंदविण्यात आली.आजच्या काळात सापडलेली वस्तू तिच्या मालकाला परत मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकीची आवश्यकता असते. जिंतूर आगारातील मेस्को सुरक्षा रक्षक शेख समी यांनी दाखविलेली तत्परता ही केवळ हरवलेली बॅग परत करण्यापुरती मर्यादित नसून, सार्वजनिक जीवनातील नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारी आणि पोलिसांनी केलेली कार्यवाही यामुळे संबंधित व्यक्तीला आपले साहित्य परत मिळाले. सापडलेल्या वस्तूंचा मोह न करता त्या योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचविणे, हीच खरी कर्तव्यनिष्ठा आहे. शेख समी यांच्या या कृतीची दखल घेऊन त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक व्हावे, अशी भावना व्यक्त होत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


## जिंतूर तालुक्यातील देवीसाहेब संस्थान श्री क्षेत्र भोगाव देवी येथील जागृत संस्थान श्री जगदंबा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील भोगाव देवी येथे पंचक्रोशीतील कुलदैवत, जागृत श्री देवीसाहेब जगदंबा मातेच्या संस्थानची ख्याती सर्वदूर पसरलेली आहे. दर्शनासाठी महाराष्ट्रासह राज्यातून भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. नवस फेडण्यासाठी देखील मोठ्या संख्येने भाविक येत असतात.जिंतूर शहरापासून 14 कि.मी. अंतरावरील आँढा रोडबर तलावाकाठी श्री देवीसाहेब जगदंबा मातेचे रामायणकालीन हेमांडपंती मंदिर उभे असून, आई जगदंबेचे हे मंदिर तुळजापूरच्यातुळजाभवानीचे उपपीठ मानले जाते. प्रभू श्रीरामचंद्रांनी वनवासात असताना जगदंबेची स्थापना केली असल्याची आख्यायिका आहे. सीतेचे हरण झाल्यानंतर त्यांचा शोध घेण्यासाठी प्रभू श्रीराम श्रीक्षेत्र नाशिक परिसरात फिरत होते. त्या ठिकाणच्या एका महर्षीनी त्यांना कार्यसिद्धीसाठी भोगाव येथे आदिशक्ती जगदंबा मातेची प्राणप्रतिष्ठा करण्यास सांगितले होते. त्यानुसार त्यांनी स्वतः जगदंबेची प्राणप्रतिष्ठा या ठिकाणी केल्याची आख्यायिका आहे. मंदिरासमोर 25 फूट उंचीची दगडी दीपमाळ आहे. प्रवेशद्वार लहान असून, मुख्य मंदिराचा हेमाडपंती गाभारा आढळून येतो. यामध्ये श्री देवीसाहेब जगदंबेचीसुंदर मूर्ती आहे. या ठिकाणच्या पूजेचा मान देशमुख (मोरे)घराण्याकडे असून, या संस्थानला 150 एकर जमीन आहे. तसेच मंदिर परिसर हा 33 गुंठ्याथा आहे. निसर्गरम्य डोंगर माथ्यावर मंदिर आहे.मंदिरासमोरील सुमारे 60 एकरच्या या तलावात प्रचंड पाण्याचा साठा होत असून, ज्यामुळे परिसरातील शेतीच्या सिंचनाची मोठी सोय होते. जिंतूर आगारातून विशेष बस चालू असून, पोलिसांचा चोख बंदोबस्त आहे. भाविकांसाठी संस्थानच्या वतीने मोफत भोजन कक्ष चालू आहे.

## नवदुर्गा नवरात्रोत्सवानिमित्त दौलताबाद व पंचक्रोशीतील नऊ कर्तृत्ववान महिलांचा भव्य सत्कार




**दौलताबाद (जावेद अहमद) :** कर्तबगार नऊ महिलांचा सत्कारनवदुर्गा नवरात्रोत्सव निमित्त दौलताबाद व पंचक्रोशीतील कर्तृत्ववान महिलांच्या सन्मानातून महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.इंजि. किशोर सोमिनाथ जाधव, ग्रामपंचायत सदस्य यांनी रविवार, 18 ऑक्टोबर रोजी दौलताबाद येथे हा कार्यक्रम पार पडला. सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा गौरवदौलताबाद व पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा या कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला. बुरहान पठाण, वैशाली आनंदे, जया पवार, योगिता नानासाहेब जाधव, ताराबाई तुपे, योगिता तुपे, नगमा कदीर शेख, शरीफा बी करीम शेख आणि शशिकला दिवेकर यांच्यासह सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांच्या कार्याची दखल घेण्यात आली.कार्यक्रमाचे निवेदन अक्षय बोरुडे यांनी केले.महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना वाव देणे आणि समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. नवदुर्गा नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून महिला सक्षमीकरणाचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. यावेळीआयोजक इंजीनियर किशोर सोमीनाथ जाधव. व इंजीनियर जयश्री किशोर जाधव.किशोर गव्हाणे ग्रामपंचायत अधिकारी, साखरचंद जाधव, चंद्रकांत जाधव, दत्तोपंत सुराशे, लक्ष्मण जाधव, शिवाजी वाढेकर, माजी ग्रामसेवक अख्तर पटेल,राधाकिसन पेरकर, रोहित देंगणे, रवी वाढेकर, अशोक वंजारे, दिपक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## वाचन संस्कृती हीच ज्ञानसमृद्ध समाजाची गुरुकिल्ली - प्रा. केशव सुर्वे




**पाटोदा (प्रतिनिधी) :** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत ज. भ. शि. प्र. मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने गुरुवार, दि. 15 ऑक्टोबर 2026 रोजी 'डिजिटल युगातील वाचन संस्कृती आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. या प्रसंगी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले. 'डिजिटल युगातील वाचन संस्कृती आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर' या एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्रो. डॉ. सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाळूज, छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथपाल प्रो. डॉ. भगवान रामभाऊ डोके उपस्थित होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रा. केशव सुर्वे हे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करून वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी ग्रंथालयाच्या प्रभावी वापराची आवश्यकता विशद केली. प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. भगवान रामभाऊ डोके यांनी 'डिजिटल युगातील वाचन संस्कृती आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर' या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या डिजिटल युगात ई-पुस्तके, ई-जर्नल्स, ऑनलाइन ग्रंथालये आणि विविध शैक्षणिक संकेतस्थळांमुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाचे विस्तृत दालन खुले झाले आहे. विद्यार्थ्यांनी या साधनांचा प्रभावी वापर करून वाचनाची आवड जोपासावी आणि शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. केशव सुर्वे यांनी वाचन संस्कृती ही ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीची गुरुकिल्ली असून डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहिती मिळविण्याची अनेक साधने उपलब्ध झाली असली, तरी पुस्तकांचे स्थान आजही महत्त्वपूर्ण आहे. पुस्तकांच्या वाचनातून व्यक्तीच्या ज्ञानात भर पडते, विचारांना प्रगल्भता येते आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांसोबतच पारंपरिक पुस्तकांचेही नियमित वाचन करावे. ई-पुस्तके, ऑनलाइन ग्रंथालये आणि विविध डिजिटल ज्ञानस्रोतांचा योग्य वापर करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे. वाचन ही केवळ अभ्यासाची गरज नसून ती आयुष्यभर ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी डिजिटल वाचनासोबतच मुद्रित पुस्तकांचेही नियमित वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बंडू लोखंडे यांनी केले, तर बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. राऊत कल्याणी जितेंद्र हिने उपस्थित मान्यवर, प्राध्यापकवृंद आणि सहभागी सर्वांचे आभार मानले. या ऑनलाइन कार्यशाळेला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करण्यासोबतच डिजिटल ज्ञानस्रोतांचा प्रभावी वापर आणि वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६


## जलजीवन मिशन पाणी पुरवठा पाइपलाइन योजनेची पाहणी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** ग्रामपंचायत दौलताबाद ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यकार्यकारी अधिकारी शिमन्नू पी.एम. (भा.प्र.से)यांच्या दि 16 ऑक्टोबर रोजी आढावा बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार दौलताबाद येथे जल जीवन मिशन योजने अंतर्गत प्रवीण देशपांडे, उप अभियंता गणेश मोरे, कनिष्ठ अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण रवि गायकवाड (प्रकल्प व्यवस्थापक) ,किशोर गव्हाणे ग्रामपंचायत अधिकारी दौलताबाद ,शशिकांत भोकरे यांच्यासह गाव अंतर्गत पाणीपुरवठा पाईप लाईनची संयुक्त पाहणी करण्यात आली

## दौलताबाद प्राथमिक आरोग्य केंद्राची सहसंचालकांकडून पाहणी




**दौलताबाद (जावेद अहमद) :** आरोग्यसेवा आयुक्त तथा अभियान संचालक यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. अर्चना भोसले यांनी दौलताबाद प्राथमिक आरोग्य केंद्राला सोमवारी 11 वाजता भेट देऊन विविध विभागांची पाहणी केली.यावेळी त्यांनी असंसर्गजन्य रोग (एनसीडी) तपासणी कार्यक्रमांतर्गत 30 वर्षांवरील रुग्णांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून माहितीची पडताळणी केली. तसेच '30 चा पल्ला, आरोग्याचा सल्ला' या अभियानाचाही आढावा घेतला. सर्व आरोग्यविषयक कार्यक्रमाचा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. संपूर्ण तालुक्यात उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. आर. वाकदकर, डॉ. श्रद्धा स्वामी, एनसीडी जिल्हा समन्वयक जावेद कुरेशी यांच्यासह दौलताबाद प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत सर्व औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिक, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, चालक, HLL ब्लॅक टेक्निशियन, आशा गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका उपस्थित होते


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## वैरदावाकार दिलीप कांबळेना काव्यांगण साहित्य मंचचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**अहिल्यानगर :** सातेफळ तालुका कळंब येथील ग्रामीण साहित्यिक ऍड.दिलीप कांबळे यांनी गेली ४० वर्ष साहित्यिक ,सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक, क्षेत्रात समाज हितासाठी निस्वार्थीपणे केलेल्या विशेष कार्याची दखल घेऊन काव्यांगण साहित्य मंच महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे हा राज्यस्तरीय पुरस्कार काव्यांगण मंचेचे आदरणीय संस्थापक अध्यक्ष विकासजी राठोड, यांनी जाहीर केला आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा काव्यांगण मंच आयोजित काव्यांगण दीपोत्सव दुसऱ्या राज्यस्तरीय कवी संमेलनात संमेलन अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व्याख्याते मा सुभाष सोनवणे (अहिल्यानगर )संमेलनाचे उद्‌घाटक मा प्रवीणजी स्वामी आमदार लोहारा उमरगा मतदार संघ संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा बी पी सिंग प्राचार्य पोतदार इंग्लिश स्कूल उमरगा यांचे उपस्थितीत या संमेलनाचे सन्माननीय प्रमुख अतिथी साहित्यिक, समाजसेवक, समाज विकास संस्था प्रमुख मा भूमिपुत्र वाघ मा डॉक्टर संजयजी राठोड मा श्रीमती सुवर्णाताई पवार (कवियत्री गीतकार) इचलकरंजी इत्यादी मान्यवरांच्या हस्ते रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पोतदार इंग्लिश स्कूल उमरगा जिल्हा धाराशिव येथे होणार आहे हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्यामुळे साहित्यिक दिलीप कांबळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे या पुरस्काराबद्दल , धाराशिव जिल्ह्यातील प्रा.रवी सुरवसे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. राजा जगताप ,विजय गायकवाड , तुकाराम गंगावणे, के व्ही सरवदे सर ,जयराज खुणे,पंडित कांबळे ,प्रभाकर बनसोडे, रमेश बोर्डेकर, एड विश्वजीत शिंदे ,एड झीनत प्रधान ,एड मंगेश गाजरे, एड अजित कांबळे, इत्यादी मित्र परिवारातून अभिनंदन होत आहे.

## 'मराठी भाषा वाङ्मय सेवा गौरव पुरस्कार' देऊन डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचा केला सन्मान



**छत्रपती संभाजीनगर :** मराठी साहित्याच्या क्षेत्रात सामाजिक प्रश्नांना वैचारिक अधिष्ठान देत समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनवादी विचारांची प्रभावी मांडणी करणारे प्रा. डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार यांना सन 2026 चा 'मराठी भाषा वाङ्मय सेवा गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पहिले परिवर्तनवादी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्कार वितरण सोहळ्यास सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ , प्रख्यात विचारवंत व माजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रल्हाद लुलेकर आणि ज्येष्ठ पत्रकार रतनकुमार साळवे, आपली वैचारिक भूमिका ठोस मांडणारे डॉ. शिवाजी वाठोरे आणि डॉ. सुधीर अनवले ऍड, रामेश्वर तायडे, डॉ.प्रज्ञाताई साळवे, यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते झालेला हा सन्मान डॉ. लिहिणार यांच्या साहित्यिक आणि वैचारिक कार्याची दखल घेणारा ठरला.प्रा. डॉ.बाळासाहेब लिहिणार हे मराठी साहित्याच्या माध्यमातून सामाजिक वास्तवाचे भान, चिकित्सक दृष्टिकोन, समतेची जाणीव आणि परिवर्तनवादी विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या लेखनातून वंचित, उपेक्षित आणि शोषित घटकांच्या प्रश्नांना अभिव्यक्ती मिळत असून सामाजिक न्याय, मानवी मूल्ये आणि विवेकनिष्ठ विचारांचा पुरस्कार केला जातो. मराठी भाषा व वाङ्मयाच्या समृद्धीसाठी त्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण साहित्यिक योगदानाची दखल घेऊन त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला.'मराठी भाषा वाङ्मय सेवा गौरव पुरस्कार' हा केवळ वैयक्तिक सन्मान नसून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या साहित्यिक विचारांचा गौरव आहे. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाला दिशा देणारे, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे प्रभावी माध्यम आहे, ही भूमिका डॉ. लिहिणार यांच्या लेखनातून अधोरेखित होते.या पुरस्कारामुळे प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार यांच्या साहित्यिक कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून त्यांच्या सन्मानाबद्दल राजीव गांधी महाविद्यालय करमाडचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे डॉ. कालिदास फड, डॉ नरेश डहाळे, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. प्रकाश बांगर, डॉ. ललित गोल्डे आदी प्राध्यापक, डॉ बाळासाहेब गायकवाड मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० ऑक्टोबर २०२६

# आमूलाग्र क्रांतीची पायाभरणी : धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन

डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेने विषमताग्रस्त हिंदू धर्म व्यवस्थेला नाकारून सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र बदल केला. ज्यांना णुसकीचे हक्क नाकारण्यात आले होते त्यांना वैज्ञानिक युगाकडे घेऊन जाण्याचे काम बाबासाहेबांनी केलं. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजाचा आज मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. सामाजिक आणि राजकीय भान त्याच्यात आले आहे. सामाजिक गुलामगिरीची मानसिकता बदलून तो आता नव्या युगाकडे मार्गक्रमण करू लागला आहे. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून साऱ्या जगाला दाखवून दिले आहे की हा धर्म विकासाकडे प्रगतीकडे जाऊ शकतो. हा धर्म नसून तो धम्म आहे. धम्म हा आचरण विषयक नियमांनी बांधल्या गेलेला असतो. बौद्ध धम्मात कर्मकांडांला, बुवाबाजीला, शोषणाला अजिबात महत्त्व नाही. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्य बौद्ध धम्माची आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा नुसार पूर्वीच्या अस्पृश्य समाजाने आपले वर्तन आणि आचरण ठेवले. जुन्या विषमताग्रस्त चालीरीती, रूढी, परंपरा बाजूला ठेवून वैज्ञानिक विचाराचा त्याने आग्रह धरला. ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला ते फार पुढे गेलेत. ज्यांनी पारंपारिक मूल्यांचा स्वीकार केला ते आहे त्याच ठिकाणी राहिले. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा ह्या खऱ्या अर्थाने जीवनाला प्रगतीपथाकडे घेऊन जाणाऱ्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने प्रचंड छळले होते. निसर्गाने दिलेले माणुसकीचे हक्क त्यांचे हिरावले होते. बाबासाहेबांनी स्वतः हे अनुभवले होते. ते ज्या समाजातून आले त्या समाजालाही हिंदू धर्म व्यवस्थेच्या यातना भोगाव्या लागल्या. बाबासाहेबांनी ज्ञान संपादन करून या समाजाला बाहेर काढले.. गौतम बुद्धांनी विषमताग्रस्त पारंपरिक विचारप्रणालीला नाकारले होते. बुद्धाचे हेच सामाजिक परिवर्तनाचे सूत्र बाबासाहेबांनी स्वीकारले. बुद्धाला जसा माणूस मुक्त करायचा होता तशाच प्रकारे बाबासाहेबांना सुद्धा येथील विषम समाज व्यवस्थेमधून आपल्या समाजाला बाहेर काढायचे होते. हे सर्व प्रयत्न त्यांनी केले. येथील प्रस्थापित व्यवस्थेला त्यांनी आमुलाग्र बदलायचा प्रयत्न केला. मात्र या व्यवस्थेने नेहमीच त्यांचा तिरस्कार केला. आज विचार करता असे लक्षात येते की, बाबासाहेबांनी या समाजाला विषमव्यवस्थेमधून बाहेर काढले नसते तर आज परिस्थिती कशी असती? हिंदू धर्म व्यवस्थेने व्यक्तीला आत्ममग्न करून टाकलं होतं. त्यापलीकडे बघायलाच तो तयार नव्हता. या पारंपरिक चौकटीमधून बाहेर निघण्याचा मार्ग त्यांनी शोधला. सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या सर्वांचा अवलंब करणाऱ्या व्यवस्थेचा मार्ग त्यांनी स्वीकारला. हा मार्ग त्यांना फक्त बुद्धाने दाखविलेल्या विचारसरणीत दिसून आला. बौद्ध धर्म हा माणसाचा सन्मान करणारा धर्म आहे. सामाजिक संवेदनशीलता जपणारा धर्म आहे. हा धर्म वैज्ञानिक विचार प्रणालीकडे घेऊन जाणारा धर्म आहे. विश्वबंधुत्वाची भावना जोपासणारा धर्म आहे. वर्तमान युगांत याच विचारसरणीची मोठ्या प्रमाणात समाजाला गरज आहे. आज आपण बघतो समाजात मोठ्या प्रमाणात दुभंगलेपण दिसून येते. विज्ञानाने मोठी क्रांती केली. माणूस चंद्रावर पोहोचला. आज तर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या काळात मानवाने मोठीच प्रगती केली आहे. मात्र तंत्रज्ञानाची प्रगती ही खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती ठरू शकत नाही. वरपांगी बदल मोठ्या प्रमाणात झाली. मात्र माणूस स्वतःमधील संवेदनशीलता हरवून बसला आहे. नको तितके सामाजिक प्रश्न आज वाढले आहे. तंत्रज्ञानामुळे ही सामाजिक संबंध घट्ट होण्याऐवजी दुभंगलेपण समाजात निर्माण होत आहे. विज्ञानाच्या आधारे माणूस माणसाचे शोषण करू लागला आहे. तंत्रशास्त्रीय बदल हे खऱ्या अर्थाने समाजात आमुलाग्र बदल घडून आणणारे हवेत मात्र माणूस हा संस्कारहीन बनल्यामुळे त्याच्यातील विकृती मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहे. वर्तमान समाजात कल्पनेच्या बाहेरचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. परस्परांमधील विश्वास नष्ट झालेला दिसून येतो. व्यक्तीमधील स्वार्थी भावना वाढलेली दिसून येते. अहंकार वाढलेला दिसून येतो. लालसा प्रचंड वाढलेली दिसून येते. मात्र माणूस माणसावर प्रेम करेनासा झाला आहे. धर्म हा माणसाच्या कल्याणासाठी असला पाहिजे हा विचार बाबासाहेबांचा होता. अज्ञान, अंधश्रद्धा, गुलामगिरी, कर्मकांड, शोषण यासारख्या मानवी हक्क हिरावून घेणाऱ्या प्रथा, परंपरा धर्म व्यवस्थेमध्ये नको. धर्म व्यवस्थेने माणसाचा सन्मान केला पाहिजे. धर्म व्यवस्थेने माणसाचे आचरण सुधारले पाहिजे. मात्र आज कर्मकांडाला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाल्यामुळे समाज दैववादी बनला आहे. दैववादी कर्मकांडी समाज प्रगतीपथाकडे जाऊ शकत नाही. आपल्या प्रश्नांची उत्तरे ही विज्ञानवादातच आपणाला मिळतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारप्रणालीचा स्वीकार आपण करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी येथील सर्वच धर्म संस्थांचा सखोल अभ्यास केला होता. धर्मसंस्थेची त्यांनी परखड समीक्षाही केली. मानवी मूल्यांचा स्वीकार करणारे आचरण आपण करायला हवे. हे आचरण विषयक मूल्ये धर्म व्यवस्था शिकवते. म्हणून धर्माची चिकित्सा झाली पाहिजे. कुणी सांगतो म्हणून एखादा विचार आपण स्वीकारायला नको. तो विचार खऱ्या अर्थाने वैज्ञानिक विचार प्रणालीवर आधारलेला असायला हवा. माणसाच्या प्रत्येक कृतीत वैज्ञानिक विचारसरणीचा अवलंब झाला पाहिजे. आज साऱ्या जगाने जी प्रगती केली ती विज्ञानाच्या सहाय्यानेच केली आहे. धर्म खऱ्या अर्थाने माणसाला नीतीचे आचरण करायला लावतो. नीती नीती शिकविण्याचे काम धर्म व्यवस्था करतो. मात्र ही नीती सम्यक विचारावर आधारलेली हवी. बाबासाहेबांची सारे शिक्षण पाश्चात्य देशात झाले असल्यामुळे त्यांच्यावर वैज्ञानिक विचारप्रणालीचा मोठा प्रभाव पडला. त्यांनी ज्या विचारवंताचा अभ्यास केला त्यांचेही चार याच पठडीतले होते. बुद्धाचा विचार, छत्रपती शिवाजी महाराजांचा कल्याणकारी राज्याचा विचार, गाडगे बाबांचा विचार, महात्मा ज्योतिराव फुले यांचा विचार, कर्मवीर भाऊराव पाटलांचा विचार, राजर्षी शाहू महाराज याचबरोबर कितीतरी समाज सुधारकांच्या विचारांचा प्रभाव बाबासाहेबांवर झाला. व याचे प्रतिबिंब आपल्या भारतीय राज्यघटनेमध्ये सुद्धा पडले आहे. पारंपारिक धर्म संकल्पना बाबासाहेबांना मान्य नव्हत्या. कोणताही धर्म हा वैज्ञानिक कसोट्याच्या आधारावर टिकला पाहिजे. सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्तता धर्म व्यवस्थेने केली पाहिजे. व्यक्तीच्या वर्तनाला त्याने वळण लावले पाहिजे. आदर्श युक्त अशा पद्धतीची वर्तन त्याने सामाजिक व्यवहार करताना करायला हवे. बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथात बाबासाहेबांनी वैज्ञानिक कसोट्यांवर आधारलेला बौद्ध धम्म सांगितला आहे. एखादी गोष्ट स्वीकारत असताना आपण त्याचा सारासार विचार करायला हवा. आपल्या मधील वैज्ञानिक दृष्टी आपण विकसित करायला हवी. हीच दृष्टी आपल्याला पले वन उज्वल बनवते. त्यांनी पारंपारिक बौद्ध धम्म बाजूला ठेवून वैज्ञानिक कसोट्यांवर आधारलेला बौद्ध धम्म स्वीकारला. बौद्ध धर्मात नीतीला मोठे महत्त्व आहे. नीती विषयक आचरण यावरच खऱ्या अर्थाने व्यक्तीची ओळख अवलंबून असते. अशा विचारसरणीचा अवलंब करणाऱ्या व्यक्ती खऱ्या अर्थाने समाजाचे हित साधणाऱ्या असतात. समाजात हीत म्हणजेच देशाचे हित. बुद्धाचा मार्ग हा कल्याणाचा मार्ग आहे. स्वतःचे हित त्याचबरोबर समाजाचे आणि देशाचे हित साधणारा हा मार्ग आहे. गुलामगिरीचे तत्त्वज्ञान बौद्ध धम्म नाकारतो. माणूस हा खऱ्या अर्थाने पारंपारिक सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त झाला पाहिजे. तरच त्याच्या जगण्याला अर्थ आहे. माणूस हा सन्मानाने एक जगायला हवा. तशी व्यवस्था त्याने निर्माण केली पाहिजे. अशा व्यवस्थेमध्ये सारा समाज प्रगतीपथाकडे जातो. आधुनिक लोकशाहीला पोषक असणारी सामाजिक सांस्कृतिक मूल्य ही बौद्ध धम्मात दिसून येतात. धार्मिक कर्मकांडापासून दूर राहून विज्ञान आणि नीती तत्व याचा आपण स्वीकार केला पाहिजे असे बाबासाहेबांना वाटायचे. धर्म हा माणसा माणसाला जोडणारा हवा. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्य बुद्धाने सांगितलेल्या धर्माच्या तत्त्वज्ञानात आहे. बौद्ध धर्म हा माणसाचा सन्मान करतो. परिवर्तनाचा स्वीकार करतो वैज्ञानिक विचारप्रणालीचा स्वीकार करतो. पारंपरिक विषमताग्रस्त समाज व्यवस्थेमध्ये असलेल्या दलित अस्पृश्य समाजाला बाबासाहेबांनी वैज्ञानिक विचारसरणीचा बौद्ध धम्म दिला. हाच धम्म तुमच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल हे त्यांनी सांगितले. आपले आचरण त्यासाठी आपण बदलले पाहिजे. बाबासाहेबांनी याला धम्मचक्रअनुप्रवर्तन असे म्हटले आहे. वैज्ञानिक विचाराचा स्वीकार, मानवी भावभावनांचा आदर, स्वातंत्र्य समता बंधुत्वाचा स्वीकार ही मूल्यतत्वे बौद्ध धम्माची आहे. आपण धर्मासाठी नाही धर्म आपल्यासाठी आहे. धर्मातून समाजाची कल्याण झाले पाहिजे. धर्माची सामाजिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून चिकित्सा झाली पाहिजे. ईश्वरावर विश्वास ठेवणारा धर्म नको. माणुसकीवर विश्वास ठेवणारा धर्म हवा. विज्ञान निष्ठा त्यामध्ये असायला हवी. माणसा माणसातील व्यवहार हे समतेची असायला हवे. तर्क आणि बुद्धीच्या कसोटीवर धर्माची पारख झाली पाहिजे. धर्माची ही चिकित्सा झाली पाहिजे हा विचार बाबासाहेबांचा होता. बौद्ध धर्मात व्यक्तीच्या सामाजिक व्यवहाराला महत्त्व होते. नैतिक आचरणाला महत्त्व होते. गुलामी मानसिकता बाजूला सारून सामाजिक बंधुत्वाचे नाते त्याने जपायला हवे. जो धर्म अशा पद्धतीचे विचार सांगतो त्याच धर्माचे आपण पालन करावे. हा धर्म बौद्ध धर्म असून त्यातील मूल्य संस्कार हे माणसाच्या प्रगतीला चालना देणारे आहेत. बौद्ध धम्मानुसार आचरण करणे हे खरंतर कठीण काम आहे. मात्र प्रयत्न करायला हरकत नाही. हे आचरण कोणीही करू शकते आणि स्वतःला प्रगतीपथाकडे नेऊ शकते. आज बाहेरच्या देशात आपल्या देशाची ओळख ही बौद्ध धर्माच्या अनुषंगाने करून दिल्या जाते. बुद्धाचा सामाजिक कल्याणाचा मार्ग हा साऱ्या जगाला सामाजिक समतेकडे घेऊन जाणारा मार्ग आहे. वर्तमान गुंतागुंतीच्या आणि संघर्षाच्या काळात बौद्ध धम्माची विचारसरणीच खऱ्या अर्थाने साऱ्या जगाला एका सूत्रात बांधण्याचे कार्य करेल. वर्तमानात एवढी प्रगती झाली असली तरी माणूस हिंसा करू लागला आहे. त्याचा स्वार्थ वाढला आहे. त्याचा अहंकार वाढला आहे. यापासून दूर राहण्यासाठी खऱ्या अर्थाने बौद्ध विचारप्रणालीची गरज आहे. बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय.... अशा विचारसरणीचा हा धम्म आहे. आजच्या या स्पर्धात्मक युगात मानवी सुख दुरापास्त झाला आहे अशा या पार्श्वभूमीवर बुद्धाचा समाज कल्याणकारी विचार खऱ्या अर्थाने साऱ्या जगाला मार्ग दाखवेल. बुद्धाची अहिंसा साऱ्या जगाला मार्ग दाखवेल. मानवी प्रज्ञेला जिज्ञासेला आणि विचारक्षमतेला चालना देणारा हा धम्म आहे. कारणमीमांसा हा धर्म आहे. इहलोकीक जीवनाला व मानवी मूल्यांना महत्त्व देणारा हा अनिश्वरवादी धर्म आहे. तर्काला येथे महत्त्व आहे. माझ्या बुद्धीला जे पटेल तेच मी घेणार जे पटणार नाही ते मी सोडून देणार अशी विचारसरणी देणारा हा धम्म आहे. बाबासाहेबांनी सातत्याने धर्म चिकित्सा केली. कोणतीही धर्मचिकित्साही खऱ्या अर्थानं समाजाला पुढे घेऊन जाते. वर्तमान काळात बौद्ध धर्माची नीती तत्वे याचे पालन समाजात फारसे होताना दिसून येत नाही. बौद्ध धम्माच्या अनुयायी मंडळींनी कर्मकांडात, प्रतिकामध्ये यासारख्या बाबीमध्ये अडकता कामा नये. समाज व्यापक भूमिका ही महत्त्वाची आहे. आपल्या आचरणाने आपण ओळखल्या गेलो पाहिजे. आपण आपल्या जबाबदाऱ्या गंभीरपणे बजावल्या पाहिजे. सामाजिक समतेचे सामाजिक समतेचे आणि सौहार्दाचे वातावरण आपण टिकवले पाहिजे. काळानुरूप स्वतः बदल केला पाहिजे. भविष्यातील आव्हानाचा विचार आपण केला पाहिजे. समाजाच्या भल्याचा विचार करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. त्यासाठी एकमेकांना समजावून घेऊन, प्रोत्साहन देऊन पुढे जाण्याचा आपण मार्ग स्वीकारावा. मैत्री भावना आपण वाढवावी. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार हा उगाचच केला नाही. त्यासाठी अधिकाधिक ज्ञान संपादन करून स्वतःसह आपल्या समाजाचा उद्धार करण्यासाठी आपण झटले पाहिजे. भारतीय राज्य घटनेमध्ये बौद्ध धम्म तत्वे स्वीकारली आहेत. जी समाजाला एकत्र बांधण्याचा प्रयत्न करतात. वर्तमानात परस्पर विसंवाद वाढला असून तो दूर होणे गरजेचे आहे. अविश्वास वाढला आहे. संशय वाढला आहे. माणूस माणसापासून दूर होणे हा समाजासाठी, देशासाठी मोठा धोका आहे. निकोप समाजाच्या निर्मितीसाठी बौद्ध धम्माची मूलतत्वे महत्त्वपूर्ण आहे.

**प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**समाजशास्त्र विभाग**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना.**